पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक- ५
सभावृत्तांत

दि.- ६/८/२०१४ वेळ दुपारी २:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि.६/८/२०१४ रोजी दुपारी २.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१ मा.गव्हाणे सुरेखा शंकर सभापती
२. मा.आल्हाट मंदा उत्तम
३. मा.काळजे नितीन प्रताप
४. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५. मा.संजय मल्हारराव वाबळे
६. मा.सुपे आशा रविंद्र
७. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
८. मा.अजित दामोदर गव्हाणे
९. मा.गोफणे अनुराधा देविदास
१०.मा.महेशदादा किसन लांडगे
११. मा.लोंढे शुभांगी संतोष
१२.मा.विश्वनाथ विठोबा लांडे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.दुरगूडे- इ क्षेत्रीय अधिकारी, श्री.दांगट- प्रशासन अधिकारी, मा.साळवी-कार्यकारी अभियंता (स्थापत्य), मा.बरशेट्टी- कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), मा.घोडे- कार्यकारी अभियंता विदयूत, श्री.पाटिल-उपअभियंता विदयुत, श्री.माने- उपअभियंता, (पापु), श्री.सेठीया मनोज- उपअभियंता, (जलनिसा:रण) श्री.काळे - उपअभियंता (स्थापत्य्) श्री.इप्प्कायल-लेखाधिकारी, श्री.तावरे मुख्य आरोग्य् निरीक्षक, श्री.भाऊसाहेब साबळे - उपअभियंता स्थापत्य, श्री. शिंदे एच.एस. – उपअभियंता स्थापत्य. श्री.जगताप – कार्यालयीन अधिक्षक. श्रीम.अनघा दिवाकर – पर्यवेक्षक

तसेच इ क्षेत्रीय कार्यालयातर्गत येणारी प्राथमिक /माध्यमिक शाळांतील पर्यवेक्षक व प्रतिनिधी उपस्थित होते.

----

**मा.सभापती-** माळणी गावातील दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या रहिवाशांना सर्वानी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

( सर्वानी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

---

मा.सभापती- सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्रमांक १) ) इ क्षेत्रीय कार्यालय समिती सभेच्या वेळेत बदल. मा.विनया तापकीर, मा.अनुराधा गोफणे यांचे पत्र.

विषय क्रमांक २) इ क्षेत्रीय कार्यालय सभागृहाचे नामकरण् मा.मंदा आल्हाट, मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ३) प्रभाग क्र.६ मधील देहू रस्त्याला लगत नामफलक बसविणेबाबत. मा.मंदाताई उत्तम आल्हाट यांचे पत्र.

विषय क्रमांक ४) प्रभाग क्र.६ मधील आळंदी रोड ते पाण्याच्या टाकीकडे जाणा-या अनुष्का बिल्डींगशेजारी १८ मी. डी.पी.रस्त्याला प्रवेशद्वार मिळण्याबाबत. मा.मंदाताई उत्तम आल्हाट यांचे पत्र.

विषय क्रमांक ५) प्रभाग क्र.६ मधील डुडूळगावामधील वहिलेनगर फाटयाचे नामफलक करणेबाबत. मा.मंदाताई उत्तम आल्हाट यांचे पत्र.

------

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.</u>**

ठराव क्रमांक- ७ विषय क्रमांक- १

दिनांक- ६/८/२०१४

सूचक- मा.विनया तापकीर अनुमोदक-मा.अनुराधा गोफणे

संदर्भ- मा.विनया तापकीर,मा.अनुराधा गोफणे यांचे पत्र.

इ क्षेत्रीय कार्यालय मासिक मिटींग ही प्रत्येक महिन्याच्या पहिल्या बुधवारी दुपारी २.०० वा.असते. त्याऐवजी मासिक सभेची वेळ ही **दुपारी ३.०० वाजता** करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- ८ विषय क्रमांक- २

दिनांक- ६/८/२०१४

सूचक- मा.मंदा आल्हाट अनुमोदक- मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ- मा.मंदा आल्हाट, मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव

इ क्षेत्रीय कार्यालयाचे प्रभाग समिती सभागृह आहे. प्रभाग समिती सभागृहाचे नाव देणेबाबत विचार करुन सभागृहास **"संत ज्ञानेश्वर महाराज सभागृह"** असे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- **९** विषय क्रमांक- **३**

दिनांक- ६/८/२०१४

सूचक- मा.विनया तापकीर अनुमोदक-मा.अनुराधा गोफणे

संदर्भ- मा.मंदाताई उत्तम आल्हाट मा.अनुराधा गोफणे यांचे पत्र.

देहूरस्ता येथे नामफलक बसविणे यासाठी तेथील रहिवाशांची मागणी आहे. तरी आपण नामफलक बसवावे व "**कै.पी.एस.आय दामोदर गेणभाऊ बोराटे चौक"** असे नामफलक बसविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक- **१०** विषय क्रमांक- **४**

दिनांक- ६/८/२०१४

सूचक- मा.विनया तापकीर अनुमोदक-मा.अनुराधा गोफणे

संदर्भ- मा.मंदाताई उत्तम आल्हाट,मा.अनुराधा गोफणे यांचे पत्र.

मोशी मधील आळंदी रोडच्या १८ मी. डी.पी.रस्त्याला "**कै.पे.चांगदेव गेणभाऊ आल्हाट"** या नावाचे प्रवेशद्वार देण्यात यावे अशी तेथील नागरीकांची मागणी आहे त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक- **११** विषय क्रमांक- **५**

दिनांक- ६/८/२०१४

सूचक- मा.विनया तापकीर अनुमोदक-मा.अनुराधा गोफणे

संदर्भ- मा.मंदाताई उत्तम आल्हाट,मा.अनुराधा गोफणे यांचे पत्र.

प्रभाग क्र .६ डूडूळगाव मधील देहू आळंदी रोड लगत वहिलेनगर ही वस्ती असून वहिलेनगरच्या फाटयाला तेथील नागरीकांची मागणी आहे. त्या फाटयाला "**वहिलेनगर"** हे नामफलक लावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

**इ क्षेत्रीय कार्यालयातर्गत प्राथमिक /माध्यमिक शाळांतील पर्यवेक्षक व प्रतिनिधी उपस्थित होते त्यांचेकडून आलेली पत्रे. त्यानुसार इ क्षेत्रीय कार्यालयातील स्थापत्य/ पाणीपुरवठा/ विद्युत/ आरोग्य/ जलनिसा:रण विभागाशी संबंधित खालील प्रमाणे कामकाज बाबत पुर्तता करणेबाबत.**

१) **भोसरी मुले क्र.४-** १) सिंमाभिंत आहे पण उंच नसल्याने त्यावरुन उडया मारुन ग्रामस्थ आत येऊन संडास व बाथरुमची नासाडी करतात. तरी सिंमाभिंतीची उंची वाढवून मिळावी. २) संडास बाथरुमच्या दारे व खिडक्या तुटलेल्या अवस्थेत आहेत. त्या बसूवन मिळाव्यात. ३) संडास बाथरुमच्या सर्व फरशा खराब झालेल्या आहेत त्या बदलून मिळाव्यात. ४) संडास बाथरुममध्ये नळ कनेक्शन तुटलेले आहे, टाक्यामध्ये पाणी साठतच नाही. त्याची दुरुस्ती व्हावी. ५) इमारतीस रंग देऊन मिळावा. ६) संडास बाथरुम इमारतीच्या आवारातच वर्गखोली बांधून दयावी. ७) ग्राऊंडवर चौथरा आहे त्यावर पत्रा बसविल्यास मुलांना जेवणासाठी पावसाळयांत व उन्हाळयात त्रास होणार नाही. फरशाही बदलून मिळाव्यात.

८) टेरेसचा पत्रा अर्थवट निघालेला आहे ९) दुस-या मजल्यावरील छत गळत आहे व ग्रील निघालेले आहे.

२) **<u>मोशी कन्या शाळा</u> –** शालेय आवारात माशांचा प्रादुर्भाव होतो. यांत्रीक पध्दतीने वर्ग खोल्या व-हांडयाची स्वच्छता केली जात नाही. फवारणी करुन मिळावी. **(आरोग्य विभाग)**

तिस-या मजल्यावरील एक वर्गखोलीतील स्लॅब लिकेज आहे. स्लॅब लिकेज काढून मिळावी. टेरेसवरील आऊटगेट पाईप फुटलेले/तुटलेले आहेत.आऊटलेट पाईप बसवून मिळावे. पटानुसार नळांची संख्या वाढवणे. नळ कोडाळयांची संख्या वाढवावी. आवश्यक टेरेस लिकेज असल्यामुळे तिस-या व दुस-या मजल्यावर पाणी साठते. शालेय आवारातील वापरात नसलेले स्वच्छतागृह नामशेष करणे. ग्रामस्थाचा त्रास होत असल्याने बाहेरील स्व्च्छतागृह नामशेष करणे. सीमा भितींची उंची वाढवून मिळावी. **(स्थापत्य विभाग)**

संपूर्ण संकुलासाठी एकच लाईट व्य्वस्था असल्यामुळे कोणती लाईन कधी जाते समजत नाही. परिपाठात् व्य्त्य्य निर्माण होतो. संपूर्ण संकुलासाठी एकच मीटर व्य्वस्था करुन मिळावी. **(विद्युत विभाग)**

३) **<u>प्राथमिक शाळा धायकरवाडी क्र. १०९ – १)</u>** स्व्च्छतागृह, मलटाकी नाही. २) पिण्याचे पाणी नाही. ३) दरवाजे खिडक्या दुरुस्ती खिडक्यांना जाळी बसविणे. ४) फरशांच्या दर्जा भरणे. ५) विद्युत वायर फिटींग करणे. ६) शालेय इमारतीला रंग देणे. ७) शालेय इमारतीवरील गळक्या पत्र्यांची दुरुस्ती करणे.

४) **<u>प्राथमिक शाळा दिघी कन्या शाळा क्र. ११८</u> -** या शाळेत नवीन २० टयुब सेट पाच फॅन दुरुस्त करावेत. तसेच इनर्व्हटर बसूवन मिळावेत. कार्यालयात नवीन टयुब बसविणे.

५) **<u>पिंपरी चिंचवड म.न.पा. दिघी कन्या शाळा क्र. ११८</u>** – १) स्लॅब लिकेज झाल्यामुळे वर्गाचा रंग खराब झालेला आहे. रंगकाम करुन मिळावा. २) संगणक खोलीला स्लाईडींग करुन मिळावे. ३) शाळेच्या ऑफिसला स्लाईडींग करुन मिळावे. ४) एक कमोड व तीन नवीन संडास बांधून मिळावेत. ५) मुलींसाठी तीन मुतारी बांधून मिळावीत ६) शाळेत अपंगासाठी भिंतीला हॅाडड्रील बसवून मिळावे. ७) दहा वर्गांच्या दरवाजांना स्टॉपर बसवून मिळावे. ८) तीस खिडक्यांना हॅन्डब्रेक बसवून मिळावेत. ९) सात दरवाजांना कडी कोयंडे बसवून मिळावे. १०) शाळेच्या मैदानातील पेव्हींग ब्लॉक खराब झालेले आहेत नवीन रंगीत ब्लॉक बसविणे आवश्यक आहे.

६) **<u>पिंपरी चिंचवड म.न.पा. शाळा बुर्डेवस्ती क्र.२८ - (च-होली बु )</u>** १) सिंमाभिंत २)मुलांसाठी-मुलींसाठी स्व्तंत्र मुता-या आवश्यक आहे.

७) **<u>प्राथमिक शाळा वडमुखवाडी क्र. २३</u> –** टॉयलेटमधील नळाला पाणी येत नाही.

८) **<u>मोशी मुले क्र. १०६</u> –** शाळेतील विद्यार्थी संध्या ७५० असल्याने नळ कोंडाळे कमी पडतात. नळ कोंडाळयाची संख्या वाढवून मिळावी. नळ नादुरुस्त व तुटलेल्या अवस्थेत आहेत. नवीन

नळ बसवावेत. पटसंख्येच्या तुलनेत विद्यार्थी एकाच नळकोंडाळयावर गर्दी करतात. मागील बाजूस नळ कनेक्शन बसवून मिळणे आवश्यक आहे. **(पाणीपुरवठा विभाग)**

नवीन इमारतीत फॅन नाही संगणक लॅब कनेक्शन नाही फॅन बसूवन मिळावेत, संगणक लॅब कनेक्शन मिळावे. ऑफिसबेल नाही ती मिळावी. लाऊडस्पीकर नादुरुस्त आहेत. हॉलमध्ये नवीन लाऊड स्पिकर फिटींग करुन बसवावेत. वर्गातील टयूब नादुरुस्त व फुटलेल्या आहेत. काहीना विद्युत पुरवठा नाही. नवीन टयुब, विद्युत पुरवठा सहीत मिळाव्यात. शालेय आवारात लाईट खांब नाहीत तरी लाईट खांब व हॅलोजन बसवून मिळावेत. **(विद्युत विभाग)**

शालेय इमारत, वर्गखोल्या व स्व्च्छतागृहाचा विचार करता सध्याच स्वच्छता कर्मचारी संख्या अपुरी आहे. स्व्च्छता कर्मचारी वाढवून मिळणे, स्व्च्छतेसाठी पुरेसे साहित्य् नाही. स्व्च्छतेसाठी आवश्यक असणारे साहित्य् पुरेसे मिळावे. इमारत स्व्च्छता होणे आवश्य्क आहे. मशिनने स्व्च्छता होणे आवश्यक आहे. **(आरोग्य् विभाग )**

काही खिडक्यांचा काचा तुटलेल्या आहेत. काही खिडक्या नादुरुस्त आहेत. तुटलेल्या खिडक्यांना नवीन काचा बसूवन मिळाव्यात. खिडक्यांची दुरुस्ती करुन मिळावी, जुनी इमारतीमधील खिडक्या बदलून मिळाव्यात. सर्व वर्गाच्या दरवाजांचे कडी कोयंडे तुटलेले आहेत. स्व्च्छतागृह व मैदानात फरशांची लेवल करुन मिळणे. तुटलेल्या फळयांच्या ठिकाणी नवीन फळया मिळाव्यात. सर्व वर्गखोल्या व प्रवेशद्वार यांना एकूण ३६ कुलूप सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक आहे. शालेय संरक्षक भिंतीचे अपूर्ण काम पुर्ण व्हावे व भिंतीची उंची वाढवावी. **(स्थापत्य् विभाग)**

९) **<u>लांडेवाडी मुले व कन्या</u> -** १) वर्गातील व व्हरांडयातील टयुबलाईट नादुरुस्त आहेत. २) वर्गातील बोर्ड तुटलेले आहेत ३) चार वर्गात लाईट नाही. ५) वर्गातील पंख्यांची दुरुस्ती नाही. **(विद्युत विभाग)**

१) काही पाण्याच्या टाक्यांना झाकणे नाहीत. २) नळ गंजलेले व तुटलेले आहेत. ३) कॉक नाहीत. ४) नळकोंडाळी तुटलेली आहे. ५) स्व्च्छतागृहात पाण्याची लाईन लिकेज आहे. **(पाणीपुरवठा विभाग)**

१) वर्गाचे दरवाजे व कडी कोयंडे नादुरुस्त आहेत. २) मैदानावर भरपूर प्रमाणात पावसाचे पाणी साचते. ३) शाळेच्या कंपाऊंड भोवती ब्लॉक ४) कंपाऊंड वॉलवर ग्रील नाहीत.**(स्थापत्य् विभाग)**

**१)** स्व्च्छतागृहात फिनेलचा वापर होत नाही. २) वर्गामध्ये डासांचा प्रादुर्भाव ३) वर्गाची पाच व्हरांडयाची स्व्च्छता मशिनच्या साहाय्याने होत नाही. **(आरोग्य् विभाग)**

१०) **<u>भोसरी कन्या शाळा क्र.</u>** १– १) जुने टॉयलेट काढून टाकणे बाहेरील लोकांना त्रास होतो. **(आरोग्य् विभाग**)

२) खिडक्या त्व्रीत बसवून मिळाव्यात. खिडक्यांना वेल्डींग करणे. दरवाजे बसविताना चौकटी व्य्वस्थित करुन प्लास्टर करुन दरवाजाला स्टॉपर बसवणे. खिडक्या असून बसवल्या नाहीत. तसेच स्लॅप गळत आहे. **(स्थापत्य् विभाग)**

बाहेरील आऊटलाईन खराब झाल्या आहेत. बेसिंगच्या नळया खराब झाल्या आहेत. टॉयलेट व नळाच्या टाईल्स खराब झाल्या आहेत. **(पाणीपुरवठा विभाग)**

ऑफिसमधील टयुबलाईट ख्राब आहेत **(विद्युत विभाग)**

**११)** **<u>बो-हाडेवाडी कन्या शाळा</u> -** १) जुनी इमारत लोडबेरींगची असून सदरच्या इमारतीची पहाणी करुन इमारत दुरुस्ती करण्यात यावी. २) इमारतीमधील जागा खोल्या कमी पडत असून बो-हाडेवाडीतील पाच एकर गायरान ताब्यात घेऊन त्याठिकाणी इमारत बांधावी. 3) पाण्याची टाकी ५००० लिटरची बसवण्यात यावी. पिण्याचे पाणी दोन्ही शाळेला कमी पडते. ४) मोठी झाडे सात असून झाडांच्या फांदया झाडावर गेलेले असून सदरच्या झाडांची छाटणी करावी.

१२) **<u>पिंपरी चिंचवड मन.पा. चोविसावाडी क्र. २१</u>** - १) मैदानावर पावसाळयात पाणी साचते मुरुम टाकण्यात यावा. २) टेरेसचा दरवाजा संपूर्ण तुटलेला आहे तसेच खिडक्या व गेटचे ग्रील बहूतेक ठिकाणी तुटलेले आहेत. खिडक्यांचा पत्रा निघालेला आहे दोन तीन खिडक्या तुटलेल्या आहेत. ३) दुस-या मजल्यावरील लाईटपुरवठा पूर्णपणे बंद पडलेला आहे कारण वायरींग नादुरुस्त झालेली आहे. ४) नळकोंडाळयाजवळ पाणी साठून बरीच दलदल होते.

१३) **<u>लांडेवाडी मुले व मुली</u>** – १) स्वच्छतेचे साहित्य् वेळेवर व पुरेशा प्रमाणात मिळावे. २) डासप्रतिबंध औषध फवारणी वरचेवर करण्यात यावी. ३) वर्गाची स्वच्छता व व्हरांडयाची स्वच्छता मशिनच्या साहाय्याने महिन्यातून एकदा तरी व्हावी.**उर्दू शाळेकरीता.**

१) वर्गातील व व्हरांडायातील टयुबलाईट बसवणे २) वर्गातील बोर्ड तुटलेले आहेत.३) पहिल्या मजल्यावरील चार वर्गात लाईट नाही. त्यामुळे वर्गात पुर्ण् अंधार पडतो. ४) काही वर्गातील पंखे नादुरुस्त आहेत. **(विद्युत विभाग)**

१) वर्गाचे दरवाजे व कडी कोयंडे नादुरुस्त् आहेत २) मैदानावर भरपूर प्रमाणात पावसाचे पाणी साचते. ३) शाळेच्या कंपाऊंड भोवती ब्लॉक ४) कंपाऊंड वॉलवर ग्रील बसवणे. **(स्थापत्य् विभाग)**

१) काही पाण्याच्या टाक्यांना झाकणे नाहीत. २) नळ गंजलेले व तुटलेले आहेत. ३) कॉक नाहीत. ४) नळकोंडाळी तुटलेली आहेत. ५) स्वच्छतागृहात पाण्याची लाईन लिकेज आहे. **(पाणी पुरवठा विभाग)**

१४) **<u>डुडूळगांव प्राथमिक शाळा क्र.१०८</u>– १)** शालेय मैदानात ब्लॉक बसवून हवेत. २) वॉल कंपाऊंड दुरुस्त करुन प्लास्टर करुन मिळावे. **(स्थापत्य् विभाग)** २) संडास बाथरुमसाठी पाणी कमी आहे. बोअरवेल आहे दुरुस्त करुन मोटार बसवून देणे. **(पाणीपुरवठा)** ३) खोल्या ४ वर्ग ५ वर्ग बैठकीची अडचण होत आहे. अंगणवाडीचे स्थ्लांतर करावे.

१५) **<u>पठारेमळा क्र. २७</u> – १)** वर्गखोल्यांमधील फरशी खराब झालेली आहे. २) खिडक्या नादुरुस्त् आहेत. **(स्थापत्य् विभाग)**

१६) **<u>प्राथमिक शाळा काळजेवाडी क्र ११०</u>** – १) वर्गाचे पत्रे दुरुस्त् करुन मिळावे. २) खिडक्या दुरुस्ती आवश्यक आहे ३) टॉयलेट पर्यंत पाईप जोडणी करुन मिळावी.

**१७) <u>भोसरी इंग्रजी माध्यम शाळा</u> -** १) जुने टॉयलेट काढून टाकणे, बाहेरील लोकांचा त्रास होतो. तळमजल्यावर तीन वर्ग असल्यामुळे लहान मुलांना दुर्गंधीचा त्रास होतो. **(आरोग्य् विभाग)** २) रंगकाम चालू आहे खिडक्या दरवाजे बसवणे चालू आहे. खिडक्या त्वरीत बसवून मिळाव्यात. वेल्डींग करणे. दरवाजांना चौकटी बसवून प्लास्टर करुन मगच बसवणे, दरवाजाला स्टॉपर बसवणे, कार्यालयाला स्लायडींग विंडो करणे. **(स्थापत्य् विभाग)** ३) बाहेरील आऊटलाईन खराब झाल्या आहेत वॉश बेसींगच्या नळया खराब झाल्या आहेत. टॉयलेट व नळाच्या टाईल्स खराब झाल्या आहेत. **(पाणीपुरवठा)** ४) ऑफिसमधील टयुबलाईट खराब झाल्या आहेत**. (विद्युत)**

१८) **<u>भोसरी कन्या शाळा क्र. १</u>** – १) टॉयलेट स्व्च्छता करणे (आरोग्य् विभाग) २) स्लॅब गळतो भिंती भिजतात भिंती पडण्याची भिती आहे. ग्रील निसटलेले आहेत रंग गेलेला आहे. (स्थापत्य् विभाग) ३) काही वर्गातील लाईट लागत नाही. भिंतीत पाणी मुरत असल्याने विद्युत पुरवठा खंडीत होतो.

उपरोक्त् शाळेंच्या संदर्भात असलेल्या अडीअडचणी "इ" क्षेत्रीय कार्यालयाच्या ज्या विभागांतर्गत येतात त्यांनी तातडीने व वेळेत पुर्ण कराव्यात. कुठल्याही प्रकारची दिरंगाई अथवा टाळाटाळ अपेक्षित नाही आपण सर्वांनी गांभिर्याने नोंद घ्यावी. अशी मा.अध्यक्ष यांनी सर्वांना सुचना केली.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(गव्हाणे सुरेखा शंकर)
सभापती
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/कावि/१८८/२०१४
दिनांक- २०/०८/२०१४

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.